मराठवाड्याच्या आर्थिक विकासात कामगार चळवळीतील शेतमजूर स्त्रियांच्या भूमिकेचा अभ्यास: (2010-11 ते 2020-21)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड मानव्याविद्याशाखे अंतर्गत
“अर्थशास्त्र” विषयाचे पीएच. डी. पदवीसाठी सादर करावयाचा
संशोधनपूर्व आराखडा

संशोधक
मीना गंगाधर आरसे
सामाजिक शास्त्रे संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मार्गदर्शक
प्रा.डॉ. मोहोकार हरिहर शिवदास,
इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, नवीन नांदेड- ४३१६०३.

संशोधन केंद्र
सामाजिक शास्त्रे संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

जुलै 2023

प्रस्तावना :

प्रस्तुत संशोधक अर्थशास्त्र या सामाजीक शास्त्रांतर्गत आपल्या मार्गदर्शकाशी चर्चा करून मराठवाड्याच्या आर्थिक विकासात शेतमजूर चळवळीतील स्त्रियांच्या योगदानाचा अभ्यास: २०२०-२०२१ असा पीएच. डी. पदवीसाठी संशोधन विषय निश्चित केलेला आहे. त्यानुसार संशोधन अध्ययन करत असताना संशोधकाने प्रस्ताविकात मराठवाड्यातील आर्थिक विकासात शेतकरी व शेतमजूरांनी दिलेल्या योगदानाचा अभ्यास करत असताना कामगार चळवळींची पार्श्वभूमी अभ्यासली जाईल त्यात शेतमजूर व शेतकरी यांचा आर्थिक विकासातील योगदानाची चर्चा केली जाईल तसेच कामगार कायदे व कामगार चळवळ तसेच कामगारांच्या कल्याणाच्या दृष्टीने उपाययोजना यांची चर्चा केली जाईल.

भारतातील जवळपास ५५% पेक्षा जास्त लोकांच्या उपजीविकेचे साधन हे कृषी व निगडीत क्षेत्र आहे तसेच हा भारतीय अर्थव्यवस्थेचा महत्वपूर्ण घटक मानला जातो आणि भारत हा कृषी प्रधान देश म्हणून ओळखला जातो. भारतासह महाराष्ट्रांमध्ये व पर्यायाने मराठवाड्यामध्ये हजारो वर्षांपासून जमीनदारी व्यवस्था अस्तीत्वात आहे. त्याचा परीणाम मराठवाडा सामाजिक-आर्थिक विषमता उपभोगत आहे आणि अल्पभूधारक शेतकरी - शेतमजूर आणि मोठे जमीनदार असे दोन शोषित व शोषक वर्ग निर्माण झालेले आहेत. पूर्णतः कृषी क्षेत्रावर आधारीत असणाऱी मराठवाड्याची अर्थव्यवस्था जी GDP मध्ये होणारी वाढ कृषी क्षेत्रात होणाऱ्या वाढीच्या समप्रमाणात आहे ती शेतकरी शेतमाजुरांवर आधारीत आहे मराठवाड्यातील कामगार संखेच्या सरासरी ७४.२१% कामगार ही शेतकरी आणि शेतमजूरांच्या एकत्रीतरित्या मिळून आहेत, तर ८५.१६% एवढी शेतकरी व शेतमजूर स्त्रीयांची संख्या आहे.

महाराष्ट्रातील भूमीहीनांचा संघर्ष दादासाहेब गायकवाड , गोदुताई परोळेकर, क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखालील आणि इतर छोट्या-मोठ्या जनसंघटनांनी संघर्ष केलेल्या कारणाने १९७२ च्या महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थीतीवर आधारीत देशात प्रथम रोजगार हमी योजनाची स्थापणा

करण्यात आली, रोजगार हमी योजना मुळे बहुसंख्य अल्पभूधारक शेतकरी आणि भूमिहीन मजुरांना रोजगार मिळालेला आहे परंतु रोजगार हमी योजनेतील अमलबजावणी प्रशासकीय अधिकारी आणि संबंधीत यंत्रणा बोगस मस्टर भरणी व प्रचंड मोठ्या प्रमाणात निधीचा अपहार करणे या कारणाने यशस्वी झालेली नाही राज्यसरकारच्या शासन निर्णयानुसार आणि राष्ट्रीय पातळीवर केंद्र -राज्य शासन मिळून महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेची स्थापणा केली आहे. महाराष्ट्रातील रोजगार हमी मंत्रालयाने बंडींग, विहीर, शेततळे, फळबाग लागवड आणि वनविभागातील मातीचे चर,पाणतळे वृक्षलागवड रोपवाटिका खुरपणी ई. प्रकारची कामे प्रयोजीत करून मोठ्या प्रमाणात रोजगार पुरवठा केल्याचा फुगवटा दाखवल्या जाऊन रोजगार हमीच्या निधीमध्ये अब्जो रुपयांचा अपहार केलेला आहे.

रोजगाराच्या हमीची अंमलबजावणी न करता रोजगार मिळवण्याची अडवणूक करणे हा भूमिहीन शेतमजूर आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांचा क्रूर छळ आहे. केंद्रशासनांचे १०० दिवस रोजगार पुरवण्याची हमी असा रोजगार हमिचा कायदा असताना करोडो भूमिहीन शेतमजूर स्थलांतर का होत आहेत? भूमिहीन शेतमाजुरांची थवेच्या थवे उपनगरीय - नगरिय ठिकाणी रोजगाराच्या शोधत भटकत आहेत भूमिहीन शतेमाजुरांना रोजगार शोधण्यासाठी उपासपोटी राहून बेहक्क प्रवासखर्च करत अतीगंभीर संकटांचा सामना करावा लागत आहे रोजगार न मिळाल्याने भूमीहीन शेतमाजुरांच्या खिशात पैशांची आवक शून्यच आहे. जागतीक असमानता अहवाल २०२२ नुसार भारतातील श्रीमंत १०% लोकांकडे गरीब ५०% लोकांकडे असणाऱ्या संपतीपेक्षा २० पट जास्त संपती आहे, त्याचप्रमाणे महाराष्ट्र आणि मराठवाड्याचीही स्थिती सारखीच आहे.
सामाजिक - आर्थिक विषमता व दारिद्रय नष्ट करून शाश्वत आणि समावेशक विकास साध्य करण्यासाठी कृषि व निगडीत क्षेत्रावर आधारीत असणाऱ्या अर्थव्यवस्थेचा कणा असणारे कामगार स्त्रीया व त्यांच्या समस्यांचे एकजुटीने निराकरण करणाऱ्या व कामगार चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या शेतमजूर स्त्रीयांच्या जीवनाला शाश्वत स्थैर्य मिळवून देण्यासाठी मराठवाड्यातील आर्थिक

विकासात कामगार चळवळीतील शेतमजूर स्त्रियांच्या भूमिकेचा अभ्यास कारणे गरजेचे आहे.

मराठवाडा क्षेत्र :

महाराष्ट्रांमध्ये प्रामुख्याने कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर असे सहा प्रशासकीय विभाग आहेत व ३६ जिल्हे आणि ३५५ तालुके आहेत. औरंगाबाद या प्रशासकीय विभागाचे भौगोलिक नाव मराठवाडा असे आहे. हा विभागात आकारमानाने सर्वात मोठा आहे, यामध्ये ८ जिल्हे आणि ७६ तालुक्यांचा समावेश आहे. मराठवाड्याची लोकसंख्या १८३१८७० असून ती महाराष्ट्राच्या लोकसंखेच्या १६.६७ प्रतीशत आहे. तसेच मारठवाड्याचे एकूण क्षेत्रफळ ६४८१३ चौ. कि. मी. असून लोकसंखेची घनता २८९.०१ ईतकी आहे. औरंगाबाद हे क्षेत्रफळाच्या दृष्टीने दुसऱ्या क्रमांकाचे मोठे शहर असून ही मराठवाड्याची राजधानी म्हणून ओळखले जाते आणि तिथे मराठवाडा विभागाचे विभागीय कार्यालय आहे. या विभागात औरंगाबाद, नांदेड, लातूर आणि परभणी या ४ महानगर पालिका आहेत. मराठवाडा विभागाचे विभागीय मुख्यालय असणारे औरंगाबाद ही उद्योगांचे केंद्र असून पर्यटकांना मोठ्या प्रमाणात आकर्षित करत असल्यामुळे रोजगारांच्या दृष्टीने महत्वाचे ठिकाण बनले आहे. या विभागात नांदेड हे शहर क्षेत्रफळाच्या दृष्टीने प्रथम क्रमांकाचे तर पर्यटन आणि रोजगार निर्मितीच्या दृष्टीने दुसऱ्या क्रमांकाचे शहर आहे. मराठवाडा विभाग हे अवर्षण प्रवण क्षेत्र म्हणून ओळखला जातो आणि येथील वार्षिक प्रजन्य ७५ ते १०० से.मी. इतके असून मध्यम काळ्या प्रकारची मृदा आढळते, तसेच उष्णकटीबंधीय काटेरी जंगले आणि शुष्क पानझडी जंगलांनी या विभागाचे एकूण ३०८६.११ चौ.की. मी. क्षेत्र व्यापलेले आहे. कमी पर्जन्यमान मुळे पीकांचे उत्पादनाचे नुकसान, कृषि मालाचे खूप कमी असणारे बाजार

मूल्य, ई. मुळे मराठवाड्यातील शेतकरी आणि शेतमजूर यांच्या जीवनमानावर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम पडत आहे.

संकल्पना :

आर्थिक विकास:

आर्थिक विकास ही संकल्पना उत्पादन वाढ, दारडोई वाढ, राहणीमान पातळीतील सुधारणा आणि औपचारीक विकास ई. अनेक बदलाचा सामूहिक स्वरूपात व्यक्त होत असतो.

सर्वसाधारण आर्थिक विकासात पुढील क्षेत्रांचा विकास समाविष्ट असतो. कृषी क्षेत्र, उद्योग, व्यापार, वाहतूक व्यवस्था, जलसिंचनाची साधने, ऊर्जेची साधने ई. ही सर्व आर्थिक विकास प्रक्रियेची निर्देशक आहेत.

आर. ई. बाल्डवीन:

यांच्या मते, “ज्या प्रक्रियेमुळे देशाच्या वास्तवीक राष्ट्रीय उत्पन्नात दीर्घकालीन वाढ घडून येते तिला आर्थिक विकास म्हणतात.”

किण्डले बर्जर:

यांच्या मते, “आर्थिक उत्पादन व ते ज्यामुळे शक्य होते त्या तांत्रिक व संस्थात्मक व्यवस्थेतील बदल म्हणजे आर्थिक विकास.”

मजूरी:

उत्पादनाच्या विविध घटकांपैकी मजूर हा एक घटक असून मजुराने दिलेल्या सेवेबद्दल जो मोबदला दिल जातो किंवा घेतला जातो त्यास वेतन किंवा मजूरी म्हणतात.

बेनहॅम यांच्या मते, “मजुराने केलेल्या सेवेबद्दल किंवा कार्याबद्दल विनियोजकाने करारानुसार त्यास शोधण केलेली मुद्रा म्हणजे मजुरी होय.”

म्हणजेच मजूरास त्यांच्या कार्याबद्दल करारानुसार दिलेला मोबदला हीच मजूरी असते, मजुरीस श्रमाची किंमत असे म्हणतात.

मजूर:

ज्या व्यक्ती आपली सेवा इतरांना विशिष्ट कामसाठी व विशिष्ट मोबदल्यात विकावयास तयार असतात त्यांना मजूर किंवा श्रम म्हणतात. हा उत्पादनाचा महत्वाचा घटक मानला जातो. त्याला मिळणाऱ्या मोबादल्यास मंजूरी म्हणतात. श्रम हा मानवी घटक असल्यामुळे त्याला भावना असतात. म्हणून तो भूमी व भांडवल या घटकांपेक्षा वेगळा असतो.

डॉ. मार्शल यांच्या मते, “आनंद मिळवण्या व्यतीरिक्त आर्थिक मोबदला मिळवा या उद्देशाने मानवाने केलेले शारीरिक आणि मानसिक प्रयत्न म्हणजे श्रम होय.”

श्रम:

प्रा. थॉमस यांच्या मते, “आर्थिक मोबदल्याच्या अपेक्षेने केलेले कोणतेही शारीरिक मानसिक मानवी प्रयत्न म्हणजे श्रम होय.”

भूमि:

डॉ. मार्शल यांच्या मते, “निसर्गाने मानवास देणगी म्हणून दिलेल्या सर्व वस्तु आणि शक्ती होय.” (All the things and powers gifted by nature to human) या नैसर्गिक वस्तु आणि शक्ती मानवास सहाय्यक आहेत. त्या मानवांद्वारे नाश होत नाहीत किंवा त्यांचे पुनरुत्पादन होऊ शकत नाही. भूमी या सदरात फक्त शेतजमीन किंवा इमारती जागा यांचाच समावेश होत नसून त्यात खाणी, पर्वत, नद्या, जंगले, समुद्र, समुद्रकिनारा, हवामान, ई. चा समावेश होत असून, ही मानवाला मिळालेली मोफत देगणी आहे. भूमी या घटकाचा पुरवठा संपूर्ण अलवचीक असतो.

शेतमजूर:

"जी व्यक्ती केवळ पीक उत्पादनाच्या कामतच नव्हे तर शेतीच्या अनुषंगिक व्यवसायात म्हणजे दुग्ध व्यवसाय, फलोत्पादन, जनावरे पाळणे, मधमशा पालन, ई. मोलाने किंवा अदलाबदलीने काम करते व ज्यांना मजुरी, रोख, वस्तु रूपाने अथवा अंशतः रोख व अंशतः वस्तुरूपाने अशी व्यक्ती म्हणजे शेतमजूर"

भूमिहीन शेतमजूर:

उपजीविकेसाठी दुसऱ्यांच्या जमिनीवर राबणारे आणि स्वतःच्या मालकीची जमीन नसणार हा एक शेतमजुरांचा प्रकार आहे. असे शेतमजूर स्वतंत्र असतात वेठबिगाराची किंवा गुलामाची स्थिती आशा शेतमजुरांच्या बाबतीत दिसून येत नाही. जमीन मालकाची कोणतीही बंधने या प्रकारातील शेतमजुरास मान्य नसतात.

अल्पभूधारक शेतमजूर:

स्वतःच्या मालकीची अल्प भूमी असून इतरांच्या जमिनीवर कष्ट करणाऱ्या शेतमजुरांना 'अल्पभूधारक शेतमजूर' असे म्हणतात. या प्रकारातील शेतमजूरांकडे असणारी जमीन त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी अपुरी पडते. त्यामुळे इतरांच्या जमिनीवर कष्ट केल्याशिवाय त्यांना पर्याय नसतो.

कामगार चळवळ:

कामगार चळवळ ही एक सामाजीक संघटना आहे जी कामगारांच्या हितसंबंधांसाठीच्या समान उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी कार्य करत असतात. **जॉन विल्सन** यांच्या मते, "सामाजिक व्यवस्थेत व्यापक प्रमाणावरील परिवर्तन घडवून आणण्यासाठी किंवा- घडून येणाऱ्या बदलांना प्रतिकार करण्यासाठी

जाणीवपूर्वक, संघटीतरीत्या, असंस्थीकृत साधनांचा किंवा मार्गाचा करण्यात येणारा प्रयत्न म्हणजे समाजिक चळवळ होय."

समस्या विधान :

प्रस्तुत अध्ययन विषय **माराठवाड्यातील आर्थिक विकासात कामगार चळवळीतील शेतमजूर स्त्रियांच्या भूमिकेचा अभ्यास (२०१०-११ ते २०२०-२१)** हा स्त्रियांचा सक्षमीकरणाच्या दृष्टीने व स्त्रियांच्या आर्थिक, सामाजीक, शैक्षणीक आणि नेतृत्व उत्थानासाठी अत्यंत महत्वाचा ठरणार आहे. मराठवाडा विभागात स्त्रि कामगार चळवळीतील शेतमजूर स्त्रियांची सामाजीक व आर्थिक स्थिती नेमकी कशी आहे? मराठवाड्यातील आर्थिक विकासात यांची नेमकी भूमिका काय आहे? यात प्रशासन प्रामुख्याने कोणती भूमिका पार पाडते? मराठवाड्यातील शेतमजूर स्त्रियांची शैक्षणीक स्थिती कशी आहे? कृषि क्षेत्रातील त्यांच्या कामाच्या वेतनाचे दर कोणत्या प्रकारचे आहेत? त्यांच्यासाठी शासन व प्रशासनकडून कोणकोणत्या योजना राबविल्या जातात? त्या योजनांच्या संदर्भात त्यांच्यामध्ये जागरूकता आहे काय? कामगार कायद्यांचे स्वरूप काय आहे? कृषी क्षेत्रातील महिला कामगारांसाठी कोणत्या स्वरूपाचे कायदे आहेत? या स्त्रिया कोणत्या वातावरणात काम करतात? कामगार चळवळींची नेमकी भूमिका काय आहे? शेतमजूर चळवळींची भूमिका व स्वरूप काय आहे? कामगार चळवळींत स्त्रियांची भूमिका काय आहे? महिला सक्षमीकरणात कामगार चळवळींची भूमिका काय आहे? आर्थिक विकास आणि कामगार चळवळ यांचा नेमका संबंध काय आहे? या व यासारख्या अनेक समस्यांचा शोध घेण्यासाठी संशोधकाने प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

संशोधन विषयाचे महत्व :

मराठवाड्याची अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था आहे. म्हणजेच मराठवड्याची आर्थिक वृद्धी आणि विकास हे प्रामुख्याने कृषी व निगडीत क्षेत्रावर आधारीत आहे. आणि हे कृषी व निगडीत क्षेत्र शेतामध्ये प्रत्यक्ष कस्त करणाऱ्या शेतमजुरावर व कामगारांवर अवलंबून आहे. त्याचप्रमाणे शेतमजूर व कामगार हे उपजीविकेसाठी कृषी व निगडीत क्षेत्रावर अवलंबून आहेत. आदीम काळापासून कृषी क्षेत्राच्या विकासात स्त्रियांची कामगार म्हणून प्रमुख भूमिका राहिलेली आहे. आणि ह्या शेतमजूर कामगारांच्या समस्यांना न्याय देऊन कामगारांच्या सक्षमीकरणाचे कार्य कामगार चळवळींनी केलेले आहे.

या विविध पैलूनच्या आधारे संशोधन करणे महत्वाचे आहे. त्यासाठी मराठवाड्यातील शेतमजूर स्त्रियांचे अध्ययन करत असताना कामगार चळवळीतील शेतमजूर स्त्रियांची आर्थिक विकासात भूमिका कशी आहे, कामगार चळवळीतील शेतमजूर स्त्रियांची समजीक आर्थिक स्थीतीचे अध्ययन करणे. तसेच प्रशासन यासाठी कोणती भूमिका पार पडते हे अभ्यासनेही गरजेचे वाटते. शासन व प्रशासनाकडून कोणकोणत्या योजना राबवल्या जातात त्या योजनांबद्दल स्त्रि कामगारांमध्ये कितपत जागरूकता आहे, स्त्रि शेतमजूर कामगार कायद्यांचे स्वरूप व प्रकार यांचे अध्ययन करणे, कामगार चळवळीची भूमिका व स्वरूप यांचे अध्ययन करणे, कामगार चळवळ आणि आर्थिक विकास यांच्या संबंधाचे अध्ययन करणे. यासारख्या अनेक समस्यांचा शोध घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषयाचे संशोधन होणे महत्वाचे वाटते.

संशोधन साहित्याचा आढावा :

1] **डॉ. निलय देशमुख [२०१९]** यांनी त्यांच्या **"भारतातील स्वातंत्र्यलढ्याच्या काळातील शेतकऱ्यांची आंदोलने"** या शोध निबंधामध्ये, शेतकऱ्यांचे संघटन अधोरेखीत करताना असे निष्कर्ष काढले आहे की, भारतातील शेतकऱ्यांनी संघटीत होऊन आपल्या न्याय हक्कांसाठी ई. स. १७५७ ते १९४७ पर्यंत ब्रिटिशयांच्या काळात लढे दिले गेले. परंतु शेतकऱ्यांमध्ये एकजुटता प्रांतांपूरतीच मर्यादीत राहीली कारण त्यांचा हा संघर्ष वेगवेगळ्या प्रांतांमधला होता. त्यामुळे शेतकऱ्यांची ही लढाई अविभक्त होऊ शकली नाही. परंतु गांधी व सरदार वल्लभभाई पटेलांच्या उदयानंतर त्यांनी शेतकऱ्यांच्या व ब्रिटिश सरकारला शेतकऱ्यांच्या संघटीत सांमर्थ्यासामोर नांगी टाकायला भाग पाडले.

2] **धनगारे डि. एन. [१९९०]** यांनी त्यांच्या **"Shetkari Sanghatna: The Farmers' Movement In Maharashtra- Background And Ideology."** या शोध निबंधामध्ये, शेतकरी संघटनांचा अभ्यास करत असताना १९७० च्या दशकाच्या सुरुवातीपासून महाराष्ट्रातील शेतकारींचा आढावा घेऊन या शोध निबंधांची सुरुवात केली. या नंतर १९४५-४६ ते १९७० च्या प्रदीर्घ कालावधीनंतर १९७३ मध्ये कोणत्याही मोठ्या शेतकरी आंदोलनाशियाव वेग घेतलेल्या नवीन शेतकरी चलवळींचा विचार केला आहे. अशा हालचाली अंशतः वाढीच्या प्रक्रियेच्या विरोधाभासाला प्रतीसाद होता. ज्याद्वारे मूठभर श्रीमंत शेतकरी विकासाच्या फायद्यांचे खाजकीकरण करत होते, तर असमण्या सामाजीक-आर्थिक असमानता वाढली आणि श्रीमंत शेतकरी वर्गाच्या असंतुष्ट लालसेने संस्थात्मक संधी संरचनावर गळा दाबून ठेवला जुन्या आणि नवीन शेतकऱ्यांच्या चलवळींचा वैशिष्ट्येपूर्ण वैषटयांची तुलना केलेली आहे.

चळवळीचे ऐतिहासिक महत्व कदाचित विरोधभासाने विचारसरणीच्या मागे एकत्र आलेल्या संस्थेपेक्षा त्यांच्या विशिष्ठ अत्याधुनिक वैचारीक सुत्रांमध्ये आधिक आहे असे मांडले आहे.

3] **शंकर बालाजी चव्हाण [२००४]** यांनी त्यांच्या **“अहमदनगर जिल्ह्यातील कामगार चळवळ: एक राजकीय विश्लेषण”** या Ph.d च्या प्रबंधामध्ये असे प्रतीपादित केलेले आहे की, नवीन आर्थिक धोरणामुळे शेतजमिनीचे कैंद्रीकरण हॉट आहे तर शेतमाजुरांची संख्या वाढत आहे. शेती व्यवसायात तोटा वाढत आहे तर दुसऱ्याबाजुला कर्ज वाढत आहे. त्यामुळे शेतमजूर राजयाभर विखुरला गेलेला आहे. अशावेळी शेतमाजुरांनी संघटीत होण्याचा प्रयत्न केला तर त्याला कामावरून काढून टाकलं जात आहे. त्यातच संघटीत क्षेत्रातील उद्योग कमी झाल्यामुळे संघटीत क्षेत्रातील कामगार असंघटीत, कामगारांचे स्पर्धक झाले आहेत व त्यामुळे कामगार वर्गात संघर्ष वाढत आहे. आपआपसातील स्पर्धेमुळे वेतनदारत घाट होत आहे. कामगारांना कुठेही रोजगारी स्वीकारण्यास भाग पडत आहे. त्यामुळे आर्थिक विषमता वाढत आहे. सामाजिक सुरक्षीततेच्या योजना अभावी असंघटीत कामगारांची व समाजातील इतर दुबळ्या वर्गाची आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस खालवत आहे त्यामुळे त्यांच्या राहणीमनवर अनिष्ट परिणाम हॉट आहे.

4] **विजय सूर्यभण सुर्वे [२००९]** यांनी त्याच्या Ph.D च्या **“मराठवाड्यातील कापूस प्रक्रिया उद्योगातील महिला कामगार: एक आर्थिक-सामाजिक अभ्यास” या** शोध प्रबंधामध्ये, कृषि मालाच्या विक्रीसाठी पायाभूत सुविधांचा विकास करावा, प्रामुख्याने ग्रामीण भागात पसरलेल्या उद्योगाच्या विकासासाठी रोजगाराच्या दृष्टीने विशेष सवलती देण्यात यावे, शासनाने महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाचे पुनरुज्जीवन करून शेतकरी-सहकार-ग्रामीण भागाच्या विकासाच्या दृष्टीने पावले उचलावीत, मराठवड्याला ‘कॉटन बेल्ट’ जाहीर करावे, कामगारांच्या आरोग्यासाठी फिरते आरोग्य पथक नेमून वेळोवेळी कामगारांची तपासणी करावी, महिला कामगारांच्या मुलांचा विचार करून कामाच्या ठिकाणी पाळणाघराची व्यवस्था करावी, ‘कापूस शाळा’ स्थापन करून कामगारांच्या पाल्यांच्या शिक्षणाची सोय करावी, कामाच्या ठिकाणी महिला कामगारांच्या होणाऱ्या शोषणाला प्रतीबंध करण्यासाठी महिलांच्या कायदेविषयक प्रशिक्षण किंवा कार्यशाळा आयोजीत

करण्यात याव्यात आणि या उद्योगात काम करणाऱ्या कामगार संघटनांनी कामगारांच्या न्याय हककसाठी अधिक जोमाने काम करण्याची गरज आहे. अश्या शिफारसी केलेल्या आहेत.

संशोधनाची उद्दिष्टे :

I. मराठवाड्यातील कामगार चळवळींचा अभ्यास करणे.
II. माराठवाड्यातील शेतमजूर चळवळींचा अभ्यास कारणे.
III. मराठवाड्यातील आर्थिक विकासाचा अभ्यास करणे.
IV. मराठवाड्यातील कृषि क्षेत्राच्या विकासाचा अभ्यास करणे.
V. मराठवड्यातील कामगार चळवळीतील स्त्रियांच्या आर्थिक विकासातील भूमिकेचा अभ्यास करणे.
VI. शेतमजूर स्त्रियांच्या सक्षमीकरणसाठी पर्यायाने आर्थिक विकासासाठी उपाययोजना पुरवणे व सुचवणे.

संशोधनाची गृहितकृते :

I. मराठवाड्यातील आर्थिक विकास प्रामुख्याने कृषि क्षेत्रावर आधारित आहे.
II. मराठवाड्यातील कामगार चळवळी कामगार कल्याणाचे कार्य करत आहेत.
III. शेतमजूर हेच कृषी व निगडीत क्षेत्राचा आधार आहेत.
IV. स्त्रिया ह्याच प्रामुख्याने कामगार चळवळींचा कणा आहेत.
V. आर्थिक विकासाचे नेतृत्व शेतमजूर स्त्रिया करत आहेत.
VI. मराठवाड्याच्या आर्थिक विकासात स्त्रियांचे योगदान वाढत आहे.

संशोधनाचे क्षेत्र :

संशोधन करत असताना संशोधकाने प्रथमतः संशोधन प्रक्रियेनुसार सुरुवातीस समस्यासूत्रन करावयाचे असते संशोधन विषयाची निवड केल्यानंतर अध्ययन क्षेत्र निश्चित करावे लागते. त्यानुसार संशोधकाने अध्ययन क्षेत्राची निवड केली आहे. महाराष्ट्र राज्य हे प्रमुख ६ प्रशासकीय विभागात विभागला गेलेल्या आहे. यामध्ये मराठवाडा एक प्रमुख प्रशासकीय विभाग आहे. यात ८ जिल्हे आणि ७६ तालुक्यांचा समावेश होतो. या ७६ तालुक्यातील कामगार चळवळीतील शेतमजूर स्त्रियांनी आर्थिक विकासात दिलेल्या योगदाणाचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने मराठवाडा या संशोधन क्षेत्राची निवड केली आहे.

संशोधन पद्धती :

मराठवड्यातील आर्थिक विकासात कामगार चळवळीतील शेतमजूर स्त्रियांच्या भूमिकेचा अभ्यास (२०१०-११ ते २०२०-२१) या संशोधन विषयाचे कार्य शास्त्रीय पद्धतीने करण्यासाठी समाजिक शास्त्रामध्ये संशोधनायच्या विविध पद्धती आहेत. त्यापैकी प्रस्तुत संशोधन हे ऐतिहासिक, सर्वेक्षण व अनुभववादी स्वरूपाचे असून यात वर्णनात्मक व निरीक्षणात्मक पद्धतीचा उपयोग केला जाईल. सांख्यिकीय विश्लेषण पद्धती हे या संशोधनाचे मुख्य वैशिष्ट्ये आहे.

तथ्य संकलन :

संशोधनात संशोधन समस्या किंवा घटनांच्या कारण आणि परिणामांचा शोध घेण्याचसाठी, यथार्थ बोध घेण्यासाठी, समस्येच्या निराकरणसाठी, तुलनात्मक अध्ययनासाठी, परिवर्तनाच्या अध्यायनसाठी, नियोजनासाठी संशोधनाचा आधार बनून संशोधनात तथ्यसंकलनाला विशेष महत्व प्राप्त होते. सुरुवातीला तथ्ये एकमेकांत मिसळलेली असतात. घटनेच्या कारण प्रभाव जाणून घेणे आणि निष्कर्षाला प्रमाणित करण्याच्या द्रुष्टीने तथ्यांना विशेषत्व प्राप्त होते.

अश्या तथ्यांचे स्त्रोत आणि स्वरूप या आधारावर तथ्यांचे मुख्यतः दोन प्रकार पडतात.

प्राथमिक तथ्य :

प्रस्तुत विषयाच्या अध्ययनासाठी निश्चित केलेल्या तथ्य संकलनाच्या प्राथमिक स्त्रोतामध्ये मराठवाडा विभागातील ८ जिल्ह्यातील आवश्यक ती माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने अनिसुची व प्रश्नावलीचा आधार घेतला जाईल. शेतकरी, शेतमजूर, कामगार संघटना, प्रशासकीय अधिकारी व विविध प्राधिकरणांचे पदाधिकारी यांना भेट देऊन औपचारिक स्वरूपाची चर्चा करून मुलाखत घेण्यात येईल व अभ्यासासाठीची संशोधन कार्यासाठीची आवश्यक माहिती संकलीत केली जाईल.

द्वितीय तथ्य :

प्रस्तुत संशोधनासाठीची प्राथमिक तथ्य संकलनाबरोबर द्वितीय तथ्य संकलनाचा आधार घेण्यात आला आहे. यात कामगारांच्या संदर्भात केंद्र व राज्य सरकारने वेळोवेळी लागू केलेले कायदे, व प्रसिद्ध केलेले अहवाल, मराठवाडा विभागाची आर्थिक पाहणी अहवाल, महाराष्ट्र सांख्यिकी गोषवारा, आर्थिक समालोचन अहवाल, महाराष्ट्र गॅझेटीयर, स्थलदर्शक नकाशे, गुगल, विषयाच्या संबंधित असणाऱ्या वेबसाइट, विविध संशोधन पत्रिका,

नियतकालिके, मासिके, ग्रंथ व वृत्तपत्रे यातून प्रसिद्‌ध झालेल्या माहितीचा उपयोग प्रबंध लेखनासाठी केला जाईल.

नमूना निवड :

प्रस्तुत विषयाच्या संशोधनात संशोधकाने वस्तुनिष्ठ तथ्ये संकलीत करत असताना वेळेची व पैशाची बचत करण्यासाठी व अनुभवजन्य तथ्ये प्राप्त करण्यासाठी सुलभ प्रशासन करून अभ्यास विषयाचे सखोल अध्ययन करण्यासाठी नमूना निवड पद्‌धतीचा अवलंब केला आहे. फ्रँक याटन यांच्या मते, “नमूना शब्दाचा उपयोग केवळ कोणत्याही समग्राच्या एककास किंवा एका भागाकरीत केला पाहिजे.” कोणत्याही भागाल या विश्वासाने निवडले असते की, तो समग्राचे प्रतिनिधित्व करील. श्रीमती पोलिन यंग यांच्या मते, “एक सांख्यिकीय नमूना त्या संपूर्ण समूह किंवा समग्राचे एक लघु चित्र आहे, ज्यामधून नमूना घेतला आहे.”

त्यानुसार संशोधक नमूना निवड पद्‌धतीतील, गैरसंभव्य नमूना निवड पद्‌धती अंतर्गत सहहेतुक नमूना निवड पद्‌धतीचा अवलंब करून नमूना निवडल जाईल. यासाठी मराठवाडा विभागातील एकूण ८ जिल्हयातून प्रत्येकी ४० प्रमाणे कामगार चळवळीतील एकूण ४०×८ = ३२० शेतमजूर स्त्रीया आणि प्रत्येक जिल्हयातील प्रत्येकी १० प्रमाणे १०×८ = ८० अधिकारी व पदाधिकारी आशा एकूण (३२०+८० = ४००) उत्तरदात्यांकडूक मुलाखती, प्रश्नावली व अनुसूचीद्‌वारे तथ्य संकलीत करण्यात येणार आहे.

तथ्य विश्लेषण :

तथ्यांचे संकलन प्रक्रियेनंतर तथ्यांना अंतीम रूप देण्यासाठी संकलीत तथ्यांना योग्य पद्‌धतीने प्रक्रिया करून गुणात्मक व संख्यात्मक माहिती वेगळी करून माहितीचे विश्लेषण केले व निर्वाचन केल्यानंतरच त्या तथ्यांना महत्वपूर्ण सामान्य अर्थ स्पष्ट होतो आणि त्या आधारे निश्चित निष्कर्ष काढणे

शक्य होतो व त्यानंतरच तथ्यांना सैद्धांतिक अर्थ प्राप्त होतो. माहिती विश्लेषण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांना अंतिम रूप देण्यासाठी वर्गीकरण, संकेतीकरण, मास्टर चार्ट, आलेख, स्तंभलेख, सारणी, आणि सांख्यिकीय सॉफ्टवेअर जसे (spss- statistical packages for social sciences) इत्यादींचा उपयोग करण्यात येईल.

संशोधनाच्या मर्यादा व व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन मराठवाड्यातील आर्थिक विकासात कामगार चळवळीतील शेतमजूर स्त्रीयांच्या भूमिकेचा अभ्यास (२०१०-११ ते २०२०-२१) महाराष्ट्रातील मराठवाडा विभागा पूरतेच मर्यादीत असणार आहे. यात औरंगाबाद, नांदेड, लातूर, जालना, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद, बीड, या ८ जिल्ह्यांचा समावेश होतो. आर्थिक वर्ष २०१०-११ ते २०२०-२१ या दशकातील वरील ८ जिल्ह्यांतील आर्थिक विकासात कामगार चळवळीतील शेतमजूर स्त्रियांच्या भूमिकेचा अभ्यास या संशोधनाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. मराठवाडा विभागातील कामगार चळवळीतील स्त्रियांच्या समाजिक, आर्थिक व शैक्षणिक बाबींवर प्रस्तुत विषयाच्या माध्यमातून विशेष भर देण्यात येणार आहे.

संशोधन आराखडा :

कोणत्याही विषयाच्या संशोधनासाठी संशोधन आराखडा तयार करणे गरजेचे असते. संशोधन आराखडयाशीवाय वस्तुनिष्ठ अर्थशास्त्रिय संशोधन करणे शक्य नसते. नमूना किती व कसा निवडावयाचा, तथ्य संकलन व विश्लेषण कसे केले जाणार आहे. संशोधन पद्धती कोणती वापरायची आहे, इत्यादी बाबतचे निर्णय संशोधन आराखडा ही एक अशी योजना किंवा रूपरेषा आहे की, जी समस्येच्या निर्धारणापासून तर संशोधन अहवाल शेवटच्या पायरीपर्यंत विषयाबाबत योग्य प्रकारे विचारविनिमय करून उपलब्ध पर्यायांवर

लक्ष देवून अश्याप्रकारे निर्णय घेण्यात येतात की, कमीत कमी प्रयत्न, वेळ व पैसा खर्च करून जास्तीत जास्त प्रमाणात संशोधन उद्धिष्ठांची प्राप्ती करता येईल.

प्रस्तुत विषयाचे संशोधन करण्यासाठी संशोधकाने संशोधन विषयाची निश्चित केलेली उद्धीष्ठे लक्षात घेऊन आराखडा विकसीत केला आहे. त्यानुसार वर्णनात्मक आणि अन्वेषणात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब करून संशोधन करण्यात येणार आहे.

संशोधन प्रकरण रचना :

i. **प्रस्तावना:**

प्रस्तुत प्रकरणा मध्ये, मराठवाड्याचा आर्थिक विकास, मराठवाड्यातील कामगार चळवळी, शेतकरी चळवळी व शेतकरी, कामगार कायदे मराठवाड्याची आर्थिक भौगोलिक माहीती व संशोधन पद्धती इत्यादी बाबींवर या प्रकरणांमध्ये प्रकाश टाकण्यात येणार आहे.

ii. **संदर्भ साहित्याचा आढावा:**

संशोधन साहित्याचा आढावा या प्रकरणांमध्ये कामगार चळवळ, शेतकरी चळवळ, मराठवाड्याचा आर्थिक विकास या विविध संशोधकांनी केलेल्या अभ्यासाचा आढावा त्यांनी लिहिलेले ग्रंथ, संशोधन प्रबंध, शोध निबंध, संशोधन पत्रीका, वर्तमान पत्रातील लेख, इत्यादी साहित्याचे सिंहावलोकन करण्यात येणार आहे.

iii. **मराठवड्याचा आर्थिक विकास व कामगार चळवळ:**

प्रस्तुत प्रकरणांमध्ये मराठवाड्याच्या आर्थिक विकासाचे स्वरूप व वैशिष्ट्य आणी कामगार चळवळीचे स्वरूप व वैशिष्ट्य तसेच यांतील संबंधाचा अभ्यास करण्यात येईल.

iv. मराठवाड्यातील शेतमजूर चळवळी:

प्रस्तुत प्रकरणांमध्ये मराठवाड्यातील शेतमजूर चळवळींचे स्वरूप, उदयाची कारणे, गुणधर्म, वैशिष्ट्ये, कार्य, दृष्टीकोन, परिक्षेत्र, चळवळींचा शेतकरी, व शेतमजूर स्त्रियांच्या सोबत असलेल्या संबंधाचा व परिणामांचा आढावा घेण्यात येईल.

v. मराठवाड्यातील शेतीक्षेत्र व शेतमजूर:

प्रस्तुत प्रकरण मराठवाड्यातील शेतीक्षेत्र व शेतमजूर यामध्ये, मराठवाड्यातील शेतीक्षेत्राचा आढावा घेण्यात येईल तसेच मराठवाड्यातील शेतमजूर विशेषतः स्त्री शेतमजूर यांचा आढावा घेण्यात येईल.

vi. मराठवाड्याच्या विकासात शेतमजूर चळवळीतील स्त्रीयांच्या योगदानाचा अभ्यास:

प्रस्तुत प्रकरणामध्ये, मराठवाड्यातील शेतीक्षेत्रात प्रत्यक्ष शेती करणाऱ्या शेतमजूर स्त्रिया व शेतमजूर चळवळी यांच्या संबंधाचा तसेच शेतमजूर चळवळीतील स्त्रीयांनी मराठवाड्याच्या आर्थिक विकासात दिलेल्या यौदानाचा अभ्यास करणायात येईल.

vii. निष्कर्ष व शिफारशी:

प्रस्तुत प्रकरण निष्कर्ष व शिफारशी यामध्ये तथ्यांचे विश्लेषण केल्यानंतर प्राप्त झालेले निष्कर्ष यांची मांडणी केली जाइल व योग्य त्या शिफारसी केल्या जातील तसेच योग्य त्या उपाय योजना केल्या जातील.

संदर्भ सूची :

1. प्रा. ए. बी. सवदी [२०२०-२१], महाराष्ट्राचा भूगोल, सहावी आवृती, पृष्ठ क्र. ७.९ ते ७.३०
2. Mathur B.L., [2000], Economic policy and Development RBSA publisher, *SMS Highway,* Jaipur [India], p.-11
3. Baldwin R.E., [1966], Economic Development & Growth, *Saith Extension-1 private ltd*, New Delhi-49, P.- 3.
4. Kindleberger Charles P., [1965], Economic development, *Mc Grow-Hill Book Company Ive Kog Akuswa Company, ltd.* Tokyo, P.- 3-5.
5. Prof. Patil Krishanarao, [1998], Advance Economic Theory, *Shree Mangesh Prakashan,* 23 Iaron Land, New Ramdaspeth, Nagpur, P.-298
6. डॉ. निरगुडे आर. के., प्रा. देशमुख राम [१९९१], अर्थशास्त्र संकल्पना, विवेक नगर नांदेड पृ.-१२५ ते १२७
7. डॉ. देशमुख प्रभाकर, मूजे श्री. वा., [१९८७], श्रामयांचे अर्थशास्त्र, *पार्टनर विद्या प्रकाशन,* नागपूर पृ.- ०१
8. डॉ. माथुर बी.एल., [२००८], कृषी अर्थशास्त्र, भाग-७, *अर्जुन पब्लिसिनग हाऊस,* नवी दिली, पृ.- ६० - ६१
9. डॉ. देशमुख निलय, [२०१९], "भारतातील स्वातंत्र्यलढ्याच्या काळातील शेतकऱ्यांची आंदोलने",*रिसर्च जरनी,* ISSN: 2348-7143.
10. Dhangare D.N., [1990], Shetkari Sanghatna: The Farmers' Movement in Maharashtra- Background and Ideology, *Social Action,* Vol-40[4], P.- 347-369.
11. चव्हाण एस. बी., [२००४], "अहमदनगर जिल्ह्यातील कामगार चळवळ: एक राजकीय विश्लेषण"
12. सुर्वे वि. सू., [२००९], "मराठवाड्यातील कापूस प्रक्रिया उद्योगातील महिला कामगार: एक आर्थिक-सामाजिक अभ्यास""
13. Agricultural Labour Report in India, [1960], Report of Thee Second Enquiry, Vol-1, *Ministery of Labour and Employment Govt, Of India,* P.- 407-408

14. डॉ.आगलावे पी., [2016], सामाजिक संशोधन पद्धती, सहावी आवृत्ती, *श्री साईनाथ प्रकाशन,* नागपूर, पृ.- २०६ - २११
15. Census of India 2011
16. Economic Survey of Maharashtra 2013-14, Page-21.
17. https://www.nextias.com/current-affairs/08-12-2021/world-inequality-report-2022

संशोधक
मीना गंगाधर आरसे
S**सामाजीक शास्त्रे संकुल,**
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा
विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक